संक्षिप्त वृत्त

पिलीव येथे तोतया पोलिसांनी इसमाचे दागिने पळवले

माळशिरस : स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस आहोत अशी थाप मारून दोघा भामट्यानी एका ७४ वर्षीय वृद्ध इसमाचे ५८ हजार रुपये किमतीचे दागिने घेऊन पोबारा केला. ही फसवणुकीची घटना पिलीव (ता. माळशिरस) येथे गुरुवारी सायंकाळच्या सुमारास घडली. यासंदर्भात कृष्णा विठोबा देशमुख (वय ७४ रा.पिलीव) यांनी माळशिरस पोलिसात फिर्यादा दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी दोघा भामट्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. कृष्णा देशमुख हे गुरुवारी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास गावातील खलीपे यांच्या घराजवळून निघाले होते. त्यावेळी दुचाकी वरून आलेल्या दोघा भामट्यानी त्यांना आपण गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी आहेत. असे सांगून गावामध्ये चोऱ्या, गांजा जास्त चालतात. असे म्हणून देशमुख यांच्या खिशातील सर्व साहित्य आणि हातातील अंगठी रुमालात बांधून घेऊन जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी १५ ग्रॅम सोन्याची वेढणी काढून रुमालात बांधली . तेंव्हा भामट्यांनी हातचलाखी करीत त्यांची अंगठी घेऊन पसार झाले . अशी नोंद पोलिसात झाली .हवालदार झगडे पुढील तपास करीत आहे.

माढा येथे बंद घराचे कुलूप तोडून अडीच लाखांचे दागिने पळवले

माढा : घराला कुलूप लावून परगावी गेले असता चोरट्याने दरवाजाचे कुलूप तोडून कपाटातील ७२ ग्रॅम सोन्याचे दागिने पळवले . ही चोरी माढा शहरातील स्टेशन रोड जवळ काल शुक्रवारी रात्रीच्या सुमारास उघडकीस आली. अतुल अंकुश घोलप (वय ३९) माढा येथील स्टेशन रोड परिसरात राहण्यास आहेत. ते बुधवारी सकाळी घराला कुलूप लावून कुटुंबीयासोबत सातारा येथे नातेवाईकाकडे गेले होते . गुरुवारी परतल्यानंतर त्यांना घरात चोरी झाल्याचे दिसून आले. चोरट्याने दरवाजाची कडी कोंडा तोडून कपाटातील २ लाख ३३ हजार रुपये किमतीचे दागिने चोरून नेले. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. हवालदार शिंदे पुढील तपास करीत आहेत.

सासरी का आली म्हणून विवाहितेस मारहाण; पतीसह तिघांवर गुन्हा

बारलोणी : (ता .माढा) येथे तू सासरी नांदायला का आली? इथे यायचे नाही . असे म्हणत काठी आणि लाथा बुक्क्याने केलेल्या मारहाणीत प्रियंका महेश गोसावी (वय २४ रा.सध्या रा. सुखटा जि .धाराशिव) ही विवाहिता जखमी झाली. ही घटना बारलोणी येथे गुरुवारी सायंकाळच्या सुमारास घडली. प्रियंका गोसावी असे जखमी झालेल्या विवाहितेचे नाव आहे. तिच्या फिर्यादीवरून कुर्डूवाडीच्या पोलिसांनी तिचा पती महेश शिवाजी गोसावी, पांडुरंग देवराज गोसावी आणि अनंत गणेश गोसावी (सर्व रा.बारलोणी या तिघा विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. प्रियंका गोसावी गुरुवारी सायंकाळी बारलोणी येथे पतीच्या घरी गेली होती त्यावेळी तिघांनी तू इथे यायचे नाही. असे म्हणत तिला मारहाण केली. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

चुगल्या केल्याच्या कारणावरून कोयत्याने मारहाण ; दोघांवर गुन्हा

करकंब : आदल्या दिवशी झालेल्या भांडणाचा राग तसेच चहाड्या केल्याच्या कारणावरून कोयत्याने केलेल्या मारहाणी नामदेव अनंता भिंगारे (वय ४५ रा .नांदोरे ता .पंढरपूर) हे जखमी झाले. ही घटना नांदोरे येथील करकंबम गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात करकंबच्या पोलिसांनी समाधान गुंडीबा वाघ आणि त्याचा भाऊ संतोष गुंडीबा वाघ (दोघे रा.पेहे ता .पंढरपूर) या दोघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. जखमी नामदेव भिंगारे हे गुरुवारी सकाळी दुचाकीवरून डेअरीत दूध देऊन घराकडे निघाले होते. त्यावेळी समाधान वाघ याने त्यांना वाटेल अडविले तर संतोष वाघ याने तु माझ्या सासू-सासर्यांना दारू पितो असे सांगुन चहाड्या केल्याच्या कारणावरून कोयत्याने कपाळ आणि पायावर मारून जखमी केले. अशी नोंद पोलिसात झाली . पुढील तपास सहाय्यक फौजदार शेंडगे करीत आहेत.

बांधाच्या वादातून कोयत्याने मारहाण; महिलेसह तिघे जखमी

माढा : समाईक शेतातील बांधाच्या वादातून लाथाबुक्क्या आणि कोयत्याने केलेल्या मारहाणीत महिलेसह तिघेजण जखमी झाले. ही घटना केवड (ता.माढा) येथे गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणात माढाच्या पोलिसांनी सौरभ सुधीर धर्मे त्याच्या भाऊ बबलू धर्मे, हरी नामदेव धर्मे आणि त्याचा भाऊ सुधीर धर्मे (सर्व रा.केवड ता.माढा) या चौघावर गुन्हा दाखल केला. यासंदर्भात अंगद अण्णासाहेब लटके (वय २० रा.केवड) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली.बांधाच्या पदातून वरील सर्व आरोपींनी अंगद लटके यांचे वडील आणि चुलत्यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण केली . तर त्यांची चुलती शोभा लटके यांना ऊस तोडण्याच्या कोयत्याने मारहाण करून जखमी केले. असे अंगद लटके यांच्या फिर्यादीत नमूद आहे .सहाय्यक फौजदार भापकर पुढील तपास करीत आहेत.

उजनी पर्यटन विकास केंद्राच्या सर्व्हेक्षणास गुरूवारपासून प्रारंभ

रोजगार वाढून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल

सुमारे १५० ते २०० कोटीचा निधी मंजूर

आमदार संजय शिंदे यांच्याकडूनही पाठपुरावा

सोलापूर/प्रतिनिधी

उजनी धरणाच्या पायथ्याशी पर्यटन विकास केंद्र निर्माण करण्यात येणार असून त्या कामाच्या सर्वेक्षणास गुरूवार दि. २० जूनपासून सुरुवात होणार आहे. कृषी व विनयार्ड आराखडा ३० जुलै रोजी तयार होईल. प्रकल्प अहवाल व अंतिम सादरीकरण १५ ऑगस्ट २०२४ रोजी होणार आहे व त्यानंतर साधारणता एक ते दीड महिन्यात प्रकल्पाला राज्य शिखर समितीची मान्यता मिळून पुढील काळात लवकरच या प्रकल्पाचे काम सुरू होईल, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

शुक्रवारी पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या केंद्रावर चर्चा झाली. आशीर्वाद यांनी पवार यांच्याकडे जिल्ह्याचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा सादर केला. आराखड्यास पवारांनी तात्काळ तत्वत: मान्यता देऊन यासाठी सुमारे १५० ते २०० कोटीच्या निधीची तरतूद करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

या प्रकल्पांतर्गत उजनी धरण परिसरात पाटबंधारे विभागाच्या जागेवर मोठे पाविलियन निर्माण करण्यात येऊन यात माहिती, तिकीट केंद्र व प्रतीक्षालय

उभारण्यात येणार आहे. मनोरंजन केंद्र, हॉटेल्स, १ हजार क्षमतेचे मोठे सभागृह, बोर्ड रूम,, रॉक पुल, सर्व वयोगटासाठी भारतातील सर्वात मोठा जलतरण तलाव, वॉटर फ्रंट डेक, लाईट हाऊस, बोट रॅम्प, मरीना बोट पार्किंग, वॉटर स्पोर्ट्स, फ्लाईंग वॉटर बोर्ड, बोट सफारी, क्रुझ सफारी, अक्वेटिक लाईफ यासह अन्य सुविधा पर्यटकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

सोलापूर जिल्हा हा पर्यटनासाठी खूप महत्वाचा जिल्हा असून येथे उजनी धरणात जल पर्यटन, ९१ धार्मिक स्थळे असल्याने धार्मिक पर्यटन, कृषी क्षेत्रात अग्रेसर असल्याने कृषी पर्यटन तसेच विनयार्ड पर्यटन विकसित होण्यासाठी पायाभूत सोयी सुविधा निर्माण केल्यास जिल्ह्याचा पर्यटनाच्या दृष्टीने सर्वांगिण विकास होऊन येथे देश विदेशातील पर्यटकांची संख्या वाढून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल,असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. सोलापूर जिल्ह्याचा पर्यटन विकास आराखडा सादर करताना आशीर्वाद म्हणाले की- सोलापूर जिल्ह्याची भौगोलिक रचना खूप महत्वपूर्ण आहे. जिल्हा रेल्वे व रस्त्यांनी जोडलेला असून येथे महामार्गाची संख्या व दर्जा खूप चांगला आहे. हा जिल्हा मंदिराचा जिल्हा असून येथे ९४ पर्यटन स्थळे आहेत. उजनी धरण निसर्गरम्य आणि पक्षी निरीक्षणासाठी प्रसिद्ध असून येथे अक्वॉटिक टुरिझम तसेच वॉटर स्पोर्ट टुरिझम मोठ्या प्रमाणावर विकसित होऊ शकते. उजनी धरणाचे ९० किलोमीटर लांबीचे पात्र असून येथे पर्यटकांना गोड्या पाण्याचा समुद्राचे अनुभव येऊ शकतो. उजनी धरण राष्ट्रीय महामार्गाने जोडलेले असून या ठिकाणी पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी पाटबंधारे विभागाचे जमीन उपलब्ध आहे. तसेच या ठिकाणी जगातील सर्वात मोठा जलतरण तलाव प्रस्तावित करण्यात आलेला आहे, अशी माहिती आशीर्वाद यांनी दिली.

आपला सोलापूर जिल्हा हा धार्मिक पर्यटनात ही अग्रेसर असून पंढरपुरचे श्री विठ्ठल रुक्मिणी च्या दर्शनासाठी लाखो भाविक पंढरपूर येथे येत असतात. सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर मंदिर, अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ मंदिर व कुडल- हत्तरसंग येथील संगमेश्वर मंदिर, बार्शीतील भगवंत मंदिर यांचा ही धार्मिक पर्यटन स्थळ अंतर्गत विकास केला जात असून या ठिकाणी येणारे भाविकांची संख्या ही मोठी आहे. त्याप्रमाणे च उजनी धरण परिसर व जिल्ह्यात कृषी पर्यटनाचा लाभ येता येऊ शकतो. यासाठी होम स्टे बैलगाडी सफारी, बफेलो राईड, स्थानिक व पारंपारिक सण साजरे करणे, लोककला, मासेमारी सह अन्य सुविधा पर्यटकांसाठी उपलब्ध करण्यात येतील. माळशिरस व करमाळा परिसरात विनयार्ड पर्यटन निर्माण केले जाऊ शकते. यामध्ये विन यार्ड, मनोरंजन, बायसिकल राईड, चीज टेस्टिंग, हॉटेल्स या सुविधा निर्माण करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले. उजनी धरणाच्या पर्यटन विकास आराखड्यासाठी आमदार संजय शिंदे यांनीही सातत्याने पाठपुरावा केलेला आहे.

पर्यटन प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर....

सोलापूर जिल्हा हा भारतातील एकमेव असा जिल्हा आहे ज्या ठिकाणी जल, कृषी आणि ग्रामीण पर्यटन यांचे अनोखे मिश्रण असलेला जिल्हा आहे. उजनी धरण हा या पर्यटन आराखड्याचा केंद्रबिंदू आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे १५० ते २०० कोटीचा खर्च अपेक्षित आहे. हा प्रकल्प सुरू झाल्यानंतर सोलापूर जिल्ह्यात देशी विदेशी पर्यटकांच्या संख्येत खूप मोठ्या प्रमाणावर वाढ होणार आहे. या ठिकाणी विविध व्यवसायांची निर्मिती होऊन मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होणार आहे. स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणावर चालना मिळवून येथील ग्रामीण जीवनमान यांच्यात बदल घडवून त्यांची आर्थिक उन्नती साधली जाणार आहे येथील लोकांना शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोत कायमस्वरूपी उपलब्ध होणार आहे.

काठी, दगडाने मारहाण; ४ मेंढपाळ जखमी

सोलापूर : रानामध्ये मेंढरे का सोडली ? या कारणावरून काहींनी दगड आणि काठीने केलेल्या मारहाणीत कर्नाटक राज्यातील ४ मेंढपाळ जखमी झाले. ही घटना बऱ्हाणपूर (ता. अक्कलकोट) येथे शुक्रवारी (दि. १४) सायंकाळच्या सुमारास घडली. संतोष करपे (वय २१), त्याचा भाऊ बाळू करपे (वय ३० दोघे रा. निंदाळ ता.इंडी), अमोगसिध्द पावले (वय २०) आणि मल्हारी लोखंडे (वय २० दोघे रा.विजयपूर) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

विकासाच्या मार्गावर अडथळे आणणाऱ्यांना बाजूला करू : काडादी

काळा दिवस : चिमणी पाडल्याचा निषेध

सोलापूर/प्रतिनिधी

श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याची चिमणी पाडून अडचण करण्याचा प्रयत्न काही मंडळींनी केला. त्यांना बाजूला सारून विकासाच्या कामासाठी एकजूट दाखवून द्यायची आहे. लोकसभेप्रमाणे आगामी काळात विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही आपली एकजूट कायम ठेवून काम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन कारखान्याचे मार्गदर्शक संचालक धर्मराज काडादी यांनी केले.

श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याची चिमणी गेल्यावर्षी १५ जून रोजी पाडली होती. त्यामुळे हा दिवस

सोलापूर : श्री सिध्देश्वर कारखाना स्थळावर चिमणी पाडल्याच्या निषेधार्थ काळा दिवस साजरा करण्याच्या पार्श्वभूमीवर मार्गदर्शन करताना खा. प्रणिती शिंदे.

काळा दिवस म्हणून पाळण्यात आला. या पार्श्वभूमीवर कारखाना कार्यस्थळावर आयोजित कार्यक्रमात काडादी बोलत होते. प्रमुख पाहुण्या म्हणून नूतन खासदार प्रणिती शिंदे उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी कारखान्याचे अध्यक्ष अण्णाराज ऊर्फ पुष्पराज काडादी हे होते. कारखान्याचे उपाध्यक्ष सिध्दाराम चाकोते, ज्येष्ठ सभासद हरिष कुलकर्णी यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन अशोक बिराजदार यांनी केले.

या काळा दिन कार्यक्रमास संचालक गुरुराज माळगे, शिवशंकर बिराजदार, अमर पाटील, विलासराव पाटील, मल्लिकार्जुन बिराजदार, विद्यासागर मुलगे, शिवानंद बगले, अरुण लातुरे, सिध्दाराम व्हनमाने, हरिश्चंद्र आवताडे, महादेव जम्मा, रवींद्र पाटील, रतन रिक्के, प्रभुराज मैंदर्गी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कारखान्याच्या सर्व कर्मचाऱ्यांनी काळी फीत लावून चिमणी पाडण्याचा निषेध केला.

सिध्देश्वर परिवाराचे आभार : खा. शिंदे

साखर कारखान्याची चिमणी पाडून वर्ष झाले तरी अद्याप विमानसेवा सुरू झाली नाही. वास्तविक पाहता होटगी रोड विमानतळावरून विमानसेवेसाठी खूप मर्यादा आहेत.त्यामुळे आपण बोरामणी विमानतळासाठी प्रयत्नशील असल्याचे नूतन खासदार प्रणिती शिंदे यांनी स्पष्ट केले. आपल्या विजयात धर्मराज काडादी आणि श्री सिध्देश्वर परिवाराचे योगदान मोठे आहे. त्याबद्दल आपण श्री सिध्देश्वर परिवाराचे आभारी आहोत, असे शिंदे यांनी सांगितले. काडादी यांनी प्रथमच उघड राजकीय भूमिका घेतली. त्यांच्यामुळे आपला लढा यशस्वी झाल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले.

लाचेची मागणीच सिद्ध झालीच नाही

वैद्यकीय अधिकारी लाचेच्या आरोपातून निर्दोष

बार्शी/प्रतिनिधी

ग्रामीण रुग्णालय पांगरी येथील तत्कालीन प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. श्रीकांत माधव वैद्य यांनी तक्रारदाराच्या हाताला झालेल्या फ्रॅक्चरला प्लॅस्टर करण्यासाठी म्हणून रुपये ५०० च्या लाचेची मागणी केली व ती रक्कम स्वीकारली या आरोपातून त्यांची बार्शी येथील विशेष न्यायाधीश जयेंद्र जगदाळे यांनी निर्दोष मुक्तता केली.

याची हकीकत अशी की, तक्रारदार सूर्यकांत डिडवळ रा. पुरी ता. बार्शी हे त्यांच्यावर आलेल्या मारहाणीची तक्रार पांगरी पोलीस स्टेशन येथे देऊन दि. २९/०१/२०११ रोजी न्यायवैद्यकीय प्रमाणपत्र मिळण्यासाठी पोलीस यादी घेऊन ग्रामीण रुग्णालय पांगरी येथे आले होते. त्यावेळी डॉ.वैद्य यांनी त्यांची तपासणी करुन त्यावर त्यांच्या हाताला फ्रॅक्चर झाल्याचे न्यायवैद्यकीय प्रमाणपत्र दिले होते.

तथापि, त्यानंतर सदर तक्रारदार यांनी दोन आठवड्यांनी म्हणजेच दि. ११/०२/२०११ रोजी अन्टी करप्शन ब्युरो सोलापूर यांच्याकडे डॉ. वैद्य फ्रॅक्चरचे प्लॅस्टरसाठी पेसे मागत असल्याची तक्रार केली होती. त्या तक्रारीवरुन दि.१२/०२/२०११ रोजी सापळा कारवाई करुन त्यामध्ये डॉ. वेद्य यांनी लाच स्विकारल्याबद्दल गुन्हा नोंद करुन त्याचा तपास करुन तपास अधिकारी पोलीस उपअधिक्षक संजय ताठे यांनी विशेष न्यायालयात आरोपपत्र दाखल केले होते.

त्याची चौकशी बार्शी येथील विशेष न्यायालयात झाली. त्यामध्ये सरकारपक्षाने एकूण चार साक्षीदार तपासले. त्यामध्ये तक्रारदार, पंच, सॅक्क्शनिंग अथॉरिटी, पोलीस उपाधिक्षक संजय ताठे सोलापूर यांच्या महत्वपूर्ण साक्षी नोंदविल्या. त्यामध्ये आरोपीच्या वकीलांनी साक्षीदारांच्या उलटतपासातून तक्रारदाराच्या तक्रारीत कोणतेही तथ्य नसल्याचे उलटतपासातील दिलेल्या उत्तरातून निदर्षणास आणले, तसेच अन्टी करप्शन खटल्यामध्ये लाचेची मागणी ही अत्यंत महत्वाची बाब असते, ती या प्रकरणात सिध्दच झालेली नाही, प्रकरणात लाच मागणी पडताळणी केलेली नाही, असा युक्तीवाद मांडू न फ्रॅक्चर उपचाराचे केस पेपर नसणे, प्लास्टर मटेरीअल संदर्भात चिठ्ठी नसणे तारखांमधील विसंगती असणे, प्लॅस्टर उपचारासंदर्भात रुग्णालयात आल्याबद्दल केसपेपरचा पुरावा नसणे, सर्व साक्षीदारांच्या साक्षी मधील प्रचंड प्रमाणातील विसंगती असणे, प्रकरणात खटल्या आवश्यक असणारी पुर्वमंजुरी योग्य नसणे, अशा महत्वाच्या बाबी न्यायालयाच्या निदर्शणास आणुन दिल्या. त्या अनुषंगाने उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे निवाडे सादर केले. आरोपीचे वकीलांचा सदरचा युक्तीवाद व त्यांनी दाखल केलेले न्यायालयाचे निवाडे याचा विचार करुन सरकारपक्ष लाचेची मागणीच सिध्द करु शकला नाही, त्यामुळे गुन्हा सिध्द होत नाही असे मत नोंदवुन विषेश न्यायालयाने डॉ. श्रीकांत वैद्य यांची निर्दोष मुक्तता केली.

सदरकामी डॉ. वैद्य यांच्यातर्फे अँड. शशि कुलकर्णी, अँड. मिलिंद खुपसुरे, अंड. अजिंक्य पुराणिक, अँड. आशुतोष पुरवंत, अँड. प्रसाद अग्निहोत्री, अँड. प्रणव उपाध्ये यांनी काम पाहिले. तर सरकार पक्षातर्फे अंड. पी.ए.बोचरे यांनी काम पाहिले.

राज्य सामाईक प्रवेश (सीईटी) परीक्षेचा आज निकाल

सोलापूर/प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत पदवी अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, कृषी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता येण्यात आलेली - २०२४ (पीसीएम आणि पीसीबी ग्रुप) या सामाईक प्रवेश परीक्षेचा निकाल, रविवारी (दि.१६) सायंकाळी ६.०० वाजता घोषित करण्यात येणार आहे, याची सर्व संबधित उमेदवारांनी नोंद घ्यावी, असे आवाहन आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केले आहेत.

वाढदिवस अभिष्टचिंतन विशेष

शांत, संयमी व विकासाभिमुख नेतृत्व : श्री. मल्लिकार्जुन पाटील

सोलापूर जिल्हा परिषदेचे कृषि व पशुसंवर्धन खात्याचे माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील यांचा आज वाढदिवस आहे. त्यानिमित्त...

जेऊर (ता.अक्कलकोट) येथील पाटील घराण्याचा राजकारणाचा तिसऱ्या पिढीचा वारसा पुढे नेत असलेल्या श्री मल्लिकार्जुन महादेवराव पाटील यांचा आज जन्मदिवस आहे त्यानिमित्त त्यांना मनः पूर्वक शुभेच्छा. मल्लिकार्जुन पाटील हे आपल्या कुटुंबाकडून मिळालेला राजकीय वारसा स्वतःच्या हिमतीने आणि कल्पकतेने पुढे नेत आहेत. मल्लिकार्जुन पाटील हे नेतृत्व शांत, संयमी आणि विकासाभिमुख व्यक्तिमत्व आहे. दिवसेंदिवस वाढत्या समाजकारणाबरोबरच गरजेपूरते राजकारण करणे हे ध्येय डोळ्यासमोर ठेऊन त्यांची गतिमान वाटचाल सुरु आहे. जेऊर येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटी, श्री काशिलिंग देवस्थान ट्रस्ट, श्री काशिलिंग बहुउद्देशीय संस्था, श्री काशिलिंग ग्रामीण नागरी पतसंस्था, दूध संस्था आदींचे अध्यक्ष तसेच श्री काशिलिंग शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव म्हणून काम पाहून या संस्था नावारूपास आणून लौकिकही वाढविला आहे. जेऊर येथे आजपर्यंत दोनशेच्या आसपास सर्वधर्मीय जोडप्यांचा सामुदायिक विवाह सोहळा, सर्वरोग निदान शिबीर, रक्तदान शिबीर, कोरोना काळात अडचणीत सापडलेल्यांना मदत, गावातील प्रत्येक गल्लीत तसेच मुख्य रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण, एकाच गावात पाच वेगवेगळ्या पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करणे, शासनाच्या सर्वच विभागाच्या योजनांचा लाभ आपल्या गावकरी बांधवाना मिळवून देणे असो या प्रत्येक कामात प्रत्येकांचे सहकार्य घेऊन पुढे जाणे हे कार्य निरंतर सुरु आहे.

मल्लिकार्जुन पाटील यांनी आजपर्यंत जेऊर मतदारसंघातील दोन वेळा जिल्हा परिषदेची आणि एक वेळा पंचायत समितीची निवडणूक जिंकली. या काळात अक्कलकोट पंचायत समितीचे उपसभापती तसेच सोलापूर जिल्हा परिषदेचे कृषी आणि पशुसंवर्धन सभापतीपद मिळवून मिळालेल्या संधीचे सोने करत प्रत्येक योजना आपल्या मतदारसंघातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. त्यांच्या कामाचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्याकडे जाणाऱ्या प्रत्येक माणसाचे काम बघून आशेने आलेल्यांना बेभरवश्याचे आश्वासन न देता जर ते होत असेल तर झटक्यात करणे आणि होत नसेल तर त्यांना स्पष्टपणे तसं सांगून त्यांना होणाऱ्या नुकसानीपासून वाचवणे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून कार्य करत आहेत. कोणालाही राजकारणाच्या धर्तीवर वाटेल तशी खोटी आश्वासन देऊन झुलवत ठेवणे हे त्यांना कदापिही मान्य नाही. फक्त केलेल्या कामाचं श्रेय घेणं आणि न केलेल्या कामाकडे ते कसे होईल याकडे लक्ष देऊन जाणीवपूर्वक ते होण्यासाठी प्रयत्न करणे याकडे त्यांचा कटाक्ष असतो. केलेल्या कामाची प्रसिद्धी मिळवण्याचा हव्यास कधीही त्यांच्या ध्यानीमनी येत नाही हे त्यांचे आणखी एक गुणवैशिष्ट्य आहे. आपल्याला जेवढे जमते तेवढे काम सरळ मार्गाने आणि प्रामाणिकपणे करणे याशिवाय नागरिकांना खोटी आश्वासन देऊन फसवत ठेवणे हे कधीही त्यांना जमले नाही. याशिवाय अक्कलकोट कृषी

उत्पन्न बाजार समितीवर दोनदा संचालक म्हणून निवडून आलेले आहेत. त्यातील एका कार्यकाळात सभापती म्हणून अतिशय यशस्वी काम केलेले आहेत. त्यांच्या कार्यकाळात झालेल्या सर्व कामांची आजही व्यापारी आणि शेतकरी बांधव आवर्जून आठवण काढतात. आपल्या ताब्यात असलेल्या तीन माध्यमिक शाळा, एक आश्रम शाळा आणि एक अध्यापक विद्यालय या सर्व संस्था प्रमुख म्हणून यशस्वीपणे चालवीत आहेत. त्यातून ग्रामीण भागातील अनेक गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले आणि शेकडो विद्यार्थी डीएड ही अध्यापक पदविका घेऊन शिक्षक म्हणून सेवेत रुजू झाले. याचा परिणाम म्हणून अक्कलकोट तालुक्यात या महाविद्यालयात डीएड पदविका पूर्ण करून नोकरीस लागलेले हजारो शिक्षक बांधव महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी काम करताना दिसतात. कै. काशीराया काका पाटील आणि कै. माजी आमदार महादेव पाटील यांचे आदर्श डोळ्यासमोर ठेऊन त्यांची सामाजिक व राजकीय वाटचाल सुरु आहे. सध्या काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ता आणि पदाधिकारी म्हणून तालुक्यात कार्यरत आहेत. सोलापुराचा बदललेला खासदार म्हणून निवडून आलेल्या प्रणिती शिंदे यांच्या विजयात सिंहाचा वाटा मल्लिकार्जुन पाटलांनी उचललेला आहे. त्यांच्या या कार्याची दखल देखील सर्वत्र घेतली गेली असून आगामी काळातील अक्कलकोट तालुक्यातील एक युवा आणि उमदे नेतृत्व म्हणून मल्लिकार्जुन पाटील यांच्याकडे पाहिले जाते. महाराष्ट्र आणि देशभरात उपलब्ध असलेले कृषी तंत्रज्ञान अक्कलकोट तालुक्यात उपलब्ध व्हावे या हेतूने अक्कलकोट येथे फत्तेसिंह मैदानावर शेकडो कृषी साहित्य असलेले नानाविध स्टॉल उभे करून शेतकरी बांधवाना आधुनिक पद्धतीने शेती कशी करायची आणि एकाच छत्रखाली सर्व साहित्य कसे मिळवायचे याचे ज्ञान घेण्यास मदत झाली. तसेच गावकरी व मित्रमंडळींच्या सहकार्याने कित्येक वर्षे प्रतीक्षेत असलेल्या प्रसिद्ध सोमलिंग मंदिराचा जीर्णोद्धार देखील झाला. एक आदर्श, ध्येयवेडा, विकासप्रिय, सचोटी, कणखर वृत्ती, प्रामाणिकपणा आणि युवकांबरोबर सर्वांना सोबत घेऊन पुढे जाणारे नेतृत्व म्हणून उदयास येत आहेत. त्यांच्या या आदर्श वाटचालीस आणि वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा .

लेखन: काशिनाथ कापसे,जेऊर
इरण्णा कणमुसे,जेऊर (ता. अक्कलकोट)
शब्दांकन:- दत्तात्रय कवठे
जेऊर,(ता.अक्कलकोट)